आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३,०० वाजता

१३ नोव्हेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा झंझावात

- राज्यातली जनता ही महायुतीच्या सोबत असून या निवडणुकीत महायुतीचं सरकार येईल, असा अमित शहा यांना विश्वास

- सत्तेवर येताच भाजपा आश्वासनं विसरुन जात असल्याचा मल्लिकार्जुन खरगे यांचा आरोप

- झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी दुपारी १ वाजेपर्यंत ४६ पूर्णांक २५ शतांश टक्के मतदान

**आणि**

- बुलडोझर कारवाईद्वारे आरोपीला शिक्षा देऊन न्यायालयाची भूमिका बजावण्याचा सरकारला अधिकार नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोरात सुरु आहे. सर्व पक्षांचे नेते राज्यभरात आजही ठिकठिकाणी प्रचारसभा घेत आहेत. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा, जळगाव आणि परभणी इथं सभा घेणार आहेत. भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा मुंबई आणि अहिल्यानगरमध्ये प्रचार करणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभा चंद्रपूर आणि नागपुरातल्या विविध मतदारसंघात होणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ वाशिम जिल्ह्यात कारंजा आणि ठाणे जिल्ह्यात उल्हासनगर तसंच मीरा भाईंदर इथं प्रचार करणार आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नांदेड, अकोला आणि

नागपूर येथे प्रचार करणार आहेत. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले पुण्यात प्रचार करणार आहेत. शिवाय भाजप नेते शिवराज सिंह चौहान, पियुष गोयल, प्रमोद सावंत आणि ज्योतिरादित्य शिंदे राज्यात ठिकठिकाणी प्रचार करणार आहेत.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे सोलापूरमध्ये प्रचार करणार आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी मुंबईत प्रचार करणार आहेत. काँग्रेस नेते सचिन पायलट हे चंद्रपूर, वर्धा आणि मुंबईत प्रचार करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सभा पुणे, नाशिक आणि अहिल्यानगरमध्ये होतील. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या तीन मतदारसंघांत प्रचार करणार आहेत. तर आदित्य ठाकरे मुंबईत प्रचार करणार आहेत.  मनसे अध्यक्ष राज ठाकरे वरळीत प्रचार करणार आहेत.

**<><><><><>**

राज्यातली जनता ही महायुतीच्या सोबत असून या निवडणुकीत महायुतीचं सरकार येईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी आज धुळे इथे व्यक्त केला. शिंदखेडा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार जयकुमार रावल यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. महाराष्ट्रातल्या लाडक्या बहिणीसुध्दा कमळाच्या आणि महायुतीच्या सोबत आहेत असं सांगतानाच शहा यांनी काँग्रेससह महाविकास आघाडीवर तसंच उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. महाविकास आघाडीवर टीका करताना शहा म्हणाले....

**होल्ड बाईट - अमित शहा**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं भाजपाचं सरकार खऱ्या अर्थानं संविधानाचं रक्षण करत आहे, असं प्रतिपादन भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते आज नांदेड जिल्ह्यातल्या मुखेड इथं आयोजित प्रचार सभेत बोलत होते. महाविकास आघाडीनं भाजपामुळे आरक्षण जाणार, संविधान बदलणार अशी खोटी कथानकं रचून मतं मिळवण्याचा प्रयत्न केला, अशी टीका त्यांनी केली. मात्र काँग्रेसचा दुटप्पीपणा जनतेच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची लातूरमध्ये प्रचार सभा झाली. भाजपानं मतदारांना दिलेली आश्वासन कधीच पूर्ण केली नाहीत, अशी टीका त्यांनी केली. तरुणांसाठी रोजगाराच्या संधी, शेतकऱ्यांना भाव वाढी संदर्भात दिलेली आश्वासनं सत्ता हाती घेताच भाजपा विसरून गेली, असं ते म्हणाले. काही विशिष्ट लोकांच्या हितासाठी हे सरकार काम करत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अहिल्यानगर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी १५ जिल्ह्यातल्या ४३ विधानसभा मतदारसंघांमधे आज मतदान होत आहे. सकाळी ७ वाजता

मतदानाला सुरुवात झाली असून मतदानासाठी सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातल्या ३१ विधानसभा मतदार संघातली ९५० अतिसंवेदनशील मतदान केंद्र असून तिथं ४ वाजेपर्यंत मतदान सुरू राहील. भाजपचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन, राज्यसभा सदस्य महुआ माझी, काँग्रेस नेते रामेश्वर ओराओ आदि नेत्यांचं भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे. दुपारी १ वाजेपर्यंत ४६ पूर्णांक २५ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

**<><><><><>**

केरळ मधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. काँग्रेसचे राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळे ही पोटनिवडणूक होत असून काँग्रेसतर्फे आता प्रियंका गांधी ही जागा लढवत आहेत. वायनाडमधे दुपारी १ वाजेपर्यंत ४० पूर्णांक ६७ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

**<><><><><>**

सरकार जनतेच्या सेवेसाठी समर्पित असून याच उद्देशानं सुरू केलेल्या आयुष्मान भारत योजनेमुळे जनतेच्या सुमारे सव्वा लाख कोटी रुपयांची बचत झाली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. बिहारमधल्या दरभंगा शहरात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज १२ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी आणि लोकार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्र्यांनी या कार्यक्रमात, सुमारे १२ अब्ज ६० कोटी रुपये खर्चून दरभंगा इथं बांधण्यात येणाऱ्या एम्सची पायाभरणी केली. तसंच विविध राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे विकास योजनांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. प्रधानमंत्र्यांनी यावेळी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून देशभरातल्या विविध रेल्वे स्थानकांवरच्या भारतीय

जनऔषधी केंद्राचंही उद्घाटन केलं. तसंच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातल्या योजनांची पायाभरणी देखील केली.

**<><><><><>**

कोणत्याही आरोपीची मालमत्ता नष्ट करून शिक्षा देण्याचा अधिकार सरकारला नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. राज्य सरकारांकडून केल्या जाणाऱ्या बुलडोझर कारवाईविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीवेळी न्यायालयाने आज ही टिप्पणी केली. सरकारकडून अशा प्रकारचं मालमत्तेचं पाडकाम थांबवण्यासाठी न्यायालयाने मार्गदर्शक तत्वं जाहीर केली आहेत. पाडकाम करण्याआधी आरोपीला पूर्वसूचना द्यावी असं न्यायालयाने म्हटलं आहे. या नोटीशीवर आरोपीकडून पंधरा दिवसांच्या आत किंवा स्थानिक प्रशासनाने घालून दिलेल्या कालमर्यादेत उत्तर देणं अपेक्षित आहे. या पाडकामाचं चित्रिकरण करणं, कारवाईचं दस्तऐवजीकरण करणं, जिल्हाधिकाऱ्यांना याचा अहवाल पाठवणं आणि डिजिटल पोर्टलवर कारवाईची माहिती प्रकाशित करणं अनिवार्य आहे, असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

दरम्यान, कायदेशीर प्रक्रियेशिवाय अशी कारवाई केल्यास ती सरकारची मनमानी समजली जाईल, असं न्यायालयाने म्हटलं आहे. कायद्याचं राज्य या संकल्पनेची आठवण करून देत न्यायालयाने सांगितलं की अपराध सिद्ध होईपर्यंत आरोपीला दोषी मानता येणार नाही, तसंच अशी शिक्षा देणं हे न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या अधिकारांच्या विभाजनाचं उल्लंघन ठरेलं.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचं **भाजपा आणि काँग्रेसने** स्वागत केलं आहे. हा निर्णय विशिष्ट राज्यासाठी नसून संपूर्ण देशासाठी असल्याचं भाजपा प्रवक्ते

संबित पात्रा यानी म्हटलं आहे. तर या बुलडोझर कारवाईला काँग्रेसने नेहमीच विरोध केला आहे, असं खासदार रंजित रंजन म्हणाल्या.

**<><><><><>**

पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धेच्या मुख्य फेऱ्यांना आजपासून प्रारंभ होत आहे.  यामध्ये पॅरिस पॅरा ऑलिंपिक सुवर्णपदक विजेती अवनी लेकरा हिचा दहा मीटर एअर रायफल आणि दहा मीटर मिश्र एअर रायफल या प्रकारातील खेळ पाहायला मिळणार आहे.

**<><><><><>**

अवैध फेरीवाले उभे राहणाऱ्या मुंबईतल्या २० ठिकाणांवर मुंबई महानगरपालिका आणि पोलिसांनी कडक आणि  कायमस्वरूपी  निगराणी ठेवावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यालयानं दिले आहेत. संपूर्ण मुंबईत २० संवेदनशील ठिकाणांवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केलं असून यामुळे याभागातल्या  रस्त्यांवर नागरिकांना चालणं मुश्किल झाल्याचं नोंदवत न्यायालयानं राज्य सरकार आणि पोलिसांच्या कामकाजाच्या पद्धतीवर ताशेरे ओढले.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण अप्रिका संघांदरम्यान आज तिसरा वीस षटकांचा क्रिकेट सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता सेन्च्युरियन इथल्या सुपरस्पोर्ट पार्क मैदानावर हा सामना सुरू होईल. चार सामन्याच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

**//<><><><><>//**